# अभियांत्रिकी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया पध्दती २००७-०८

शैक्षणिक वर्ष २००७-२००८ प्रथमवर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेची माहिती विद्यार्थी व पालक वर्गास अवगत होण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत यावर्षी महाराष्ट्राच्या वेगवेगळया शहरांमध्ये चर्चासत्राचे आयोजन केले होते. जवळपास २५ पेक्षा जास्त असे कार्यक्रम राबविले गेले. हया चर्चासत्रात तंत्र शिक्षण संचालनालय व विभागीय कार्यालयातील अधिका-यांची व्याख्याने, विद्यार्थी व पालकांचे शंकानिरसन झाले. या उपक्रमास भरपूर प्रतिसाद मिळाला असून विद्यार्थी व पालकवर्गाकडून संचालनालयाचे व तेथिल अधिका-यांचे अभिनंदन करण्यांत येत आहे. जे विद्यार्थी या चर्चासत्रापासून वंचित राहिले आहेत अशांकरिता हा खास लेख सादर करीत आहोत.

अभियांत्रिकी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया मुख्यत्वेकरुन खालील टप्प्यांमध्ये विभागली जाते.

१. सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) अर्ज
२. सामायिक प्रवेश परीक्षा
३. सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणानुसार गुणवत्ता यादी
४. अभियांत्रिकीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी करावयाचा (ऑनलाईन पध्दतीने)अर्ज
५. ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म)
६. गुणवत्ता दिलेला विकल्प व उपलब्ध जागा यानुसार मिळालेली अलॉटमेंट म्हणजेच विद्यार्थ्यास मिळालेला कोर्स व संस्था
७. विद्यार्थ्यांने संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करणे.
८. वरील ५,६,७ या टप्प्यांची दुस-या व तिस-या फेरीसाठी पुनरावृत्ती
९. उर्वरीत शेवटची ४थी फेरी समुपदेशन (कॉउन्सिलिंग) पध्दतीने रिक्त जागांसाठी

<u>सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) अर्ज</u>

मागील दोन वर्षापासून मेडिकल इंजिनिअरींग व फार्मसीसाठी महाराष्ट्र शासनातर्फे एकच सामाईक प्रवेश परीक्षा घेतली जाते व त्यासाठीचे अर्ज विद्यार्थ्यांकडून त्यांच्या शाळा/कॉलेजांमधून भरवून घेतले जातात. हा अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून इंजिनिअरींग / फार्मसी / मेडिकल यापैकी कोणत्या परीक्षांना अर्ज करावयाचा ही माहिती घेतली जाते.

## सामायिक प्रवेश परीक्षा

यावर्षी ही परीक्षा दिनांक १७ मे २००७ रोजी झाली व परीक्षेसाठी एकूण १,७४,१८९ विद्यार्थी बसले होते.

## सामायिक प्रवेश परीक्षेनुसार गुणवत्ता यादी

दिनांक १४ जून २००७ रोजी या परीक्षेची अभ्यासक्रमनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द झाली.

## अभियांत्रिकीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी करावयाचा (ऑनलाईन पध्दतीने)अर्ज

प्रवेश परीक्षेसाठी इंजिनिअरींग व फार्मसी अभ्यासक्रम निवडला असला तरी प्रत्यक्षात यामधील बरेच विद्यार्थी अर्ज करत नाहीत त्यामुळे सीईटी नुसार लागलेली गुणवत्ता यादी बदलू शकते व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता क्रमांकामध्ये बराच फरक पडू शकतो. म्हणून यावर्षी थेट ऑप्शन फॉर्म मागण्यापूर्वी प्रवेश प्रक्रियेसाठी इच्छूक विद्यार्थ्याकडून अर्ज मागवून त्यांच्या संबंधित शैक्षणिक अहर्ता पात्रते विषयीची व जात, जातपडताळणी, नॉन क्रिमिलेअर इत्यादी व महाराष्ट्राचा उमेदवार आहे का नाही याबाबतच्या प्रमाणपत्रांची तपासणी ॲप्लीकेशन फॉर्म रिसिप्ट सेंटर (अेआरसी) मधून करवून घेतली. संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ६८ अेआरसी कार्यरत आहेत. विद्यार्थी अर्ज कोठूनही ऑनलाईनद्वारे भरु शकतो परंतु तो त्याने अेआरसी मध्ये जाऊन प्रमाणपत्रांची तपासणी करुन कन्फर्म करणे आवश्यक आहे अन्यथा त्याचा अर्ज ग्राहय धरला जात नाही.

## ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म)

हा सर्वात महत्वाचा टप्पा आहे. ऑप्शन म्हणजे विकल्प (सेंट्रलाईज अलॉटमेंट प्रोसेस) म्हणजेच केंद्रीभूत प्रवेश पध्दती. गेल्या ५-६ वर्षापासून अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचा अलॉटमेंट पध्दतीने राबविली जाते. या पध्दतीचा मुख्य फायदा असा की, विद्यार्थ्यांना सर्व प्रवेश फे-यांसाठी प्रवेश केंद्रावर उपस्थित राहण्याची गरज नसते. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळच वाचत नाही तर मुंबई, पुणे यासारख्या शहरामध्ये १०-१५ दिवस राहणे परवडत नसल्याने त्यांच्यावरील आर्थिक बोजाही कमी होतो. तसेच गुणवत्तेनुसार कॉन्सीलिंग पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांना त्यांचा क्रमांक येईपर्यंत तिष्ठत बसावे लागते. तथापी अलॉटमेंट पध्दतीमध्ये

विद्यार्थ्यांना त्यांचे पसंतीने संस्था व अभ्यासक्रम निवडून ऑप्शनफॉर्म भरुन द्यावयाचा असतो. संगणकाद्वारे सर्व प्रवेशफे-यांचे प्रोग्रॅमिंग केलेले आहे ज्याला स्टेजेस असे म्हटले जाते. अलॉटमेंट सॉफटवेअर जेव्हा एक्झीक्युट करतात तेव्हा गुणवत्ता यादीच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या ऑप्शननुसार त्यावेळेस उपलब्ध असलेल्या जागांवर अलॉटमेंट केली जाते. म्हणजेच विद्यार्थ्यास मिळालेली अलॉटमेंट मुख्यत्वेकरुन गुणवत्ता, दिलेले ऑप्शन व त्यावेळेस उपलब्ध जागा यावरच अवलंबून असते. त्यामुळे सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ऑप्शन फॉर्म भरणे होय. विद्यार्थ्याने जर स्वतःची गुणवत्ता लक्षात घेऊन योग्य संस्था व अभ्यासक्रम निवडला तर त्यास अलॉटमेंट मिळण्याची शक्यता जास्त असते. परंतु कमी गुणवत्ता असताना चांगल्या दर्जाची संस्था व अभ्यासक्रम निवडला तर विद्यार्थ्यांचे ऑप्शन तर वाया जातात एवढेच नव्हेतर त्यास अलॉटमेंट मिळण्याची शक्यताही कमी होते. परंतु बरेच विद्यार्थी ऑप्शन फॉर्म भरताना योग्य असे होमवर्क करत नाहीत म्हणून किंवा अपु-या माहिती पोटी चुकीचे ऑप्शन देतात व अलॉटमेंटसाठी मुकतात. बरेचदा विद्यार्थी ऑप्शन गांभिर्याने न देता कॅज्युअल अॅप्रोच ठेऊन भरतात. ज्या संस्थेत त्यांना जायचे नाही त्या संस्थेचा ऑप्शन देतात व अलॉटमेंट मिळाली तर तेथे प्रवेश निश्चित करीत नाहीत म्हणजेच ते नकळत दुस-या विद्यार्थ्यांवर अन्याय करीत असतात. अन्यथा ती जागा दुस-या विद्यार्थ्यांस मिळाली असती व त्या विद्यार्थ्याचे करीअर झाले असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना नम्र विनंती की अशा प्रकारची सामाजिक जाण त्यांनी लक्षात ठेवावी व ऑप्शनचा गांभिर्याने विचार करावा.

ऑप्शन फॉर्म भरत असताना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून काही मुद्येः-

- स्वतःचा गुणवत्ता क्रमांक विद्यापीठात व संबंधित जातीच्या गुणवत्ता यादीत कितवा आहे ते पहावे.
- मागील वर्षाची कटऑफ लिस्ट (प्रत्येक फेरीसाठी) www.dte.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. यावरुन विद्यार्थ्यास ढोबळ अंदाज येऊ शकतो. त्यानुसार विद्यार्थ्यास स्वतःचे ऑप्शन ठरविणे मदत होते. परंतु निव्वळ कटऑफ विचारात घेऊन ऑप्शन भरु नये कारण प्रत्येक वर्षी विद्यार्थ्याचा अभ्यासक्रमा विषयीचा कल बदललेला असतो. एवढेच नव्हेतर संस्थेची झालेली गुणत्मक वाढ यात पडलेल्या फरकानुसारही विद्यार्थी त्यांचा पसंतीक्रमांक बदलत असतात. त्यामुळे मागील कटऑफ हा एक ढोबळ अंदाज आहे.
- महत्वाचा मुद्या म्हणजे जागांचे वर्गीकरण - एखाद्या विनाअनुदानित अभ्यासक्रमास जेव्हा ६० जागा उपलब्ध असतात तेव्हा या ६० जागांची विभागणी कशी केलेली आहे हेही पाहणे अत्यंत महत्वाचे आहे. उदा. संस्थास्तरावरील २०टक्के म्हणजे १२ जागा. अेआयईईई कोटयाच्या १५टक्के म्हणजे ९ जागा व उर्वरित ३९ जागांची महाराष्ट्र स्टेट

कॅप म्हणून विभागणी - ७०टक्के होम युनिव्हर्सिटी व ३०टक्के अदरदॅन होम युनिव्हर्सिटी. यात प्रत्येकी ५०टक्के आरक्षण मागासवर्गीयांसाठी. यामुळे प्रत्येक अभ्यासक्रमास एखाद्या विशिष्ट जागांसाठी किती जागा येतात हे पाहणेही आवश्यक आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर या जागांच्या विभागणी विषयीची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. गुणवत्ता यादीत (हायर मेरीट) सुरुवातीस असलेल्या विद्यार्थ्यांना ऑप्शन ठरविण्यासाठी या सीट डिस्ट्रीब्युशनच्या उपलब्धतेचा फायदा करुन घेता येतो.

- ऑप्शन ठरविताना सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे संस्थेचे शुल्क खरच आपल्या खिशास परवडणारे आहे का. हा मुद्दा ऑप्शन भरण्यापूर्वीच ठरवायचा आहे. कारण हे न पाहता. ऑप्शन भरला व अलॉटमेंट मिळाली आणि नंतर संस्थेची फी परवडणार नाही असे लक्षात आले तर आपण आपले स्वतःचेच नव्हे तर नकळत एका दुस-या गुणवत्ताधारक विद्यार्थ्याचे नुकसान करत असतो.
- वरील बाबीं व्यतिरिक्त विद्यार्थ्यांस हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहे की, इंजिनीयरींग अभ्यासक्रमासाठी कोणती संस्था निवडावी , स्वतःच्या शहरातच की महाराष्ट्रात कोणत्याही शहरांत, जसे मुंबईसाठी पश्चिम रेल्वे/ मध्य रेल्वे इत्यादी बाबी पहाणे आवश्यक आहे. संस्थांचे प्रकार ठरविणे, जसे शासकीय, शासकीय अनुदानीत किंवा खाजगी विनाअनुदानीत संस्था, करीअर कोणत्या अभ्यासक्रमात करावयाचे आहे, हे ठरविणे , जसे सिव्हिल, कॉम्प्युटर, आय. टी. मेकॅनिकल इत्यादी.

- ऑप्शन भरताना विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावे लागते. नं.१ चा ऑप्शन नं.२ चा ऑप्शन इत्यादी बरेचदा विद्यार्थ्यांना होम युनिव्हर्सिटी व अदर दॅन होम युनिव्हर्सिटी चे ऑप्शन देताना गोंधळ असतो. अभियांत्रिकीच्या पहिल्या प्रवेश फेरीसाठी एकूण २० ऑप्शन आहेत. कमीतकमी १ व जास्तीत जास्त २० ऑप्शन्स देता येतात. हे ऑप्शन्स देताना विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार एचयु व ओएचयु चे ऑप्शन्स कोणत्याही क्रमाने लिहू शकतात. परंतु ओएचयु चे ऑप्शन्स देताना ते महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यासोबत (ज्या युनिव्हर्सिटीचा ऑप्शन आहे त्या युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी सोडून) स्पर्धा करावयाची असते व ३०टक्के जागा उपलब्ध असतात व एचयू चा ऑप्शन दिला तर स्पर्धा फक्त होम युनिव्हर्सिटीच्याच विद्यार्थ्याबरोबर असते व ७०टक्के जागा उपलब्ध असतात.
- सध्या ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु असून ही प्रक्रिया दिनांक १७ जुलै २००७ पर्यंत चालू राहील. विद्यार्थ्यांना कोठूनही ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरता येईल परंतु विद्यार्थ्यांनी एआरसी मध्ये जाऊन ऑप्शनफॉर्मचे कन्फर्मेशन करणे बंधनकारक आहे अन्यथा त्यांचा ऑप्शनफॉर्म ग्राहय धरला जात नाही.

गुणवत्ता दिलेला विकल्प व उपलब्ध जागा यानुसार मिळालेली अलॉटमेंट म्हणजेच विद्यार्थ्यास मिळालेला कोर्स व संस्था

विद्यार्थ्यांना त्यांची गुणवत्ता, उपब्ध जागा व दिलेले ऑप्शन्स यानुसार अलॉटमेंट म्हणजेच संस्था व अभ्यासक्रम मिळतो. ही अलॉटमेंट लॉगिन आयडी वापरुन संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होते.

विद्यार्थ्यांने संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करणे.

मिळालेल्या अलॉटमेंटनुसार संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित करणे म्हणजेच स्वतःच दिलेल्या ऑप्शन्स नुसार मिळालेल्या अलॉटमेंटला आनंदाने स्विकारणे होय.

यावर्षी अलॉटमेंट पध्दती परीणामकारण व सक्षम बनविण्यासाठी खालील नियमांचा आवर्जून समावेश केलेला आहे.,

पहिल्या फेरीमध्ये पहिल्या १ ते ९ (एकूण २० पैकी) दुस-या फेरीमध्ये पहिल्या १ ते १५ (एकूण ३० पैकी) तिस-या फेरीमध्ये १ ते ४५ (एकूण ४५पैकी ) कोणताही ऑप्शन्स विद्यार्थ्यास मिळाला तर अशा विद्यार्थ्यांनी मिळालेल्या जागेवर प्रवेश निश्चित केला किंवा नाही तरीही अशा विद्यार्थ्यांना उर्वरीत कोणत्याही प्रवेश फेरी मध्ये पात्रता असणार नाही. तथापी उर्वरीत कोणत्याही ऑप्शनला अलॉटमेंट मिळालेली असेल तर विद्यार्थी त्यांच्या इच्छेनुसार प्रवेश निश्चिती करु शकतात. मात्र प्रवेश निश्चित केला तर उर्वरित फे-यांसाठी पात्रता असणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना अलॉटमेंट मिळालेली नाही असे विद्यार्थी पुढील फेरीसाठी पात्र ठरतील.

अभियांत्रिकीच्या प्रत्येक शाखा तितकीच महत्वाची आहे. ज्या शाखेत प्रवेश घ्याल त्या शाखेत उच्चतम ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा.

विद्यार्थ्यांना त्यांच्या अभियांत्रिकी प्रवेशासाठी शुभेच्छा....

प्रा. न. बा. पासलकर,
संचालक तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई